
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2023
सकाळ

# राज्यपाल रमेश बैस सोमवारी कोल्हापुरात

कोल्हापूर : राज्यपाल रमेश बैस सोमवारी (ता.१८) विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. शहरात होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठीही ते उपस्थित राहणार आहेत. दौऱ्याच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज विविध विभाग प्रमुखांची बैठक झाली. अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे व निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांनी याबाबत सर्व विभागांना आवश्यक सूचना दिल्या.



रमेश बैस

राज्यपाल बैस हे सोमवारी सकाळी कोल्हापुरात येतील. त्यानंतर श्री अंबाबाई मंदिरात दर्शन घेणार आहेत. दर्शनानंतर रेड क्रॉस रोटरी क्लब कार्यालय आणि स्वयंम रेड क्रॉस शाळेस भेट देणार आहेत. शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित दीक्षान्त समारंभाला उपस्थित राहणार आहेत. कंदलगाव येथे आयोजित विकसित भारत संकल्प यात्रेच्या कार्यक्रमामध्ये लोकांशी संवाद साधून योजनांचे महत्व पटवून देण्यासाठी चर्चा करतील. संकल्प यात्रेच्या निमित्ताने आयोजित स्टॉल्सला भेटी देवून लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांना सरकारकडून असणाऱ्या अपेक्षांची माहिती घेतील.

जनसंपर्क कक्ष
14 DEC 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात आयोजित १३व्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते बुधवारी झाले. यावेळी वीरेंद्र चित्राव, धीरज जाधव, सी.जी. रानडे, शरद आजगेकर, डॉ. रसिया पडळकर, डॉ. आसावरी जाधव उपस्थित होत्या.

# ‘वसुंधरा’कडून पर्यावरणपूरक उपक्रमांना गती

## वीरेंद्र चित्राव : विद्यापीठात वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने कोल्हापूरसह राज्यभरात पर्यावरणपूरक उपक्रमांना गती देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे, असे गौरवोद्गार महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव यांनी बुधवारी केले. शिवाजी विद्यापीठ आणि किर्लोस्कर उद्योग समूह यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या १३व्या वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर भाषा भवनात उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के होते.

यावेळी किर्लोस्कर उद्योग समूहाचे उपाध्यक्ष सी.जी. रानडे, मनुष्यबळ विकास विभागाचे प्रमुख धीरज जाधव, पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, समन्वयक शरद आजगेकर व डॉ. रसिया पडळकर उपस्थित होते. चित्राव म्हणाले, वसुंधरा महोत्सवाने कोल्हापूर परिसरात पर्यावरणविषयक जाणिवांचा प्रसार करण्याची भूमिका बजावली. महोत्सवात सादर होणाऱ्या विविध चित्रकृतींच्या माध्यमातून जगभरातले प्रयोग स्थानिकांपर्यंत पोहोचले. त्यामधून प्रेरणा घेऊन अनेक तरुण पर्यावरण चळवळीत कार्यरत झाले. या महोत्सवाच्या माध्यमातून आजवर कोल्हापूरमध्ये राबविण्यात आलेले पर्यावरणपूरक उपक्रम राज्यात सर्वत्र गौरवले गेले आहेत. चित्राव यांनी महोत्सवाच्या ‘सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि आरोग्यपूर्ण समाज’ या संकल्पनेची माहिती दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठ राबवित असलेल्या जल संधारण, ऊर्जा बचत आणि हरित परिसर या उपक्रमांसह भविष्यातीलही पर्यावरणपूरक योजना योजना सांगितल्या. यावेळी डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले.

### महोत्सवात आज...

महोत्सवात फोटोग्राफी स्पर्धा, चित्र - शिल्प प्रदर्शन, पर्यावरणपूरक सेवा प्रदर्शन, असे विविध उपक्रम आयोजित केले आहेत. आज गुरुवार व उद्या शुक्रवारपर्यंत नवीन चित्रपट, चर्चासत्र व प्रदर्शनाचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे.

14 DEC 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण समस्यांचे निराकरण व्हावे

## कुलगुरू डॉ. शिर्के : वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उद्योग आणि विद्यापीठ यांच्या संयुक्त प्रयत्नातून पर्यावरणाच्या समस्यांचे निराकरण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि किर्लोस्कर उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १३ वा वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या शाश्वत धोरणासंदर्भात मांडणी केली. विद्यापीठ राबवित असलेल्या जलसंधारण, ऊर्जा बचत आणि हरित परिसर या उपक्रमांसह भविष्यातील पर्यावरणपूरक योजना सांगितल्या.

महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव म्हणाले, वसुंधरा महोत्सवाने कोल्हापूर परिसरात पर्यावरणविषयक जाणिवांचा प्रसार करण्याची भूमिका बजावली. महोत्सवात सादर होणाऱ्या विविध चित्रकृतींच्या माध्यमातून जगभरातले प्रयोग स्थानिकांपर्यंत पोहोचले. त्यामधून प्रेरणा घेऊन अनेक तरुण पर्यावरण चळवळीत कार्यरत झाले. या महोत्सवाच्या माध्यमातून आजवर कोल्हापूरमध्ये राबविण्यात आलेले पर्यावरणपूरक उपक्रम राज्यात सर्वत्र गौरवले गेले आहेत.




**कोल्हापूर : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. शेजारी वीरेंद्र चित्राव, धीरज जाधव, सी.जी. रानडे, शरद आजगेकर, डॉ. रसिया पडळकर, डॉ. आसावरी जाधव.** (छाया : पप्पू अत्तार)

यावेळी मंचावर किर्लोस्कर उद्योग समूहाचे व्हाईस प्रेसिडेंट सी. जी. रानडे, मनुष्यबळ विकास विभागाचे प्रमुख धीरज जाधव, पर्यावरण शास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, समन्वयक शरद आजगेकर व डॉ. रसिया पडळकर उपस्थित होते.

14 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास प्रारंभ

## किर्लोस्कर उद्योग समूहातर्फे तीन दिवसांचा उपक्रम

कोल्हापूर : प्रतिनिधी

किर्लोस्कर उद्योग समूह आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने आयोजित या वर्षीच्या १३ व्या वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास बुधवारपासून प्रारंभ झाला. याचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले.

यावेळी फेस्टिव्हल डायरेक्टर वीरेंद्र चित्राव यांनी महोत्सवाच्या 'सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि आरोग्यपूर्ण समाज' या संकल्पनेची माहिती दिली. किर्लोस्कर समूहाचे सी. जी. रानडे यांनी समूहाच्या हरित उपक्रमांची



कोल्हापूर : वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी मान्यवर. (छाया : पांडुरंग पाटील)

तर एच.आर. हेड धीरज जाधव यांनी कंपनीच्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांची माहिती दिली. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख आसावरी जाधव यांनी प्रास्ताविकात पर्यावरणशास्त्र विभागाच्या उपक्रमासंदर्भात माहिती सांगितली.

या महोत्सवात फोटोग्राफी स्पर्धा, चित्र-शिल्प प्रदर्शन, पर्यावरणपूरक सेवा प्रदर्शन असे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात बुधवारी पर्यावरणपूरक नवतंत्रज्ञान, आहारविषयक संशोधन संकल्पनाचे सादरीकरण झाले. गुरुवारी सकाळी ८ वाजता विद्यापीठातील बोटॅनिकल गार्डनमध्ये क्षेत्रभेट, दुपारी २.३० वाजता डॉ. एम. एस. देशमुख, सुभाष नियोगी, परितोष कंकाळ मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी शरद आजगेकर, डॉ. रसिया पडळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

17 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## वीरेंद्र चित्राव : 'किर्लोस्कर वसुंधरा' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला प्रारंभ

# पर्यावरण संवर्धनाला उपक्रमांमुळे बळ

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : 'किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने कोल्हापूरसह राज्यभरात पर्यावरणपूरक उपक्रमांना गती देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे', असे गौरवोद्गार महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव यांनी आज काढले. शिवाजी विद्यापीठ आणि किर्लोस्कर उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तेराव्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे वि. स. खांडेकर भाषा भवनात उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. किर्लोस्कर उद्योग समूहाचे व्हाईस प्रेसिडेंट सी. जी. रानडे, मनुष्यबळ विकास विभागाचे प्रमुख धीरज जाधव, पर्यावरण शास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, समन्वयक शरद आजगेकर व डॉ. रसिया पडळकर आदी यावेळी उपस्थित होते.

### चित्रपटांसह प्रदर्शन आणि चर्चासत्रेही

■ महोत्सवात फोटोग्राफी स्पर्धा, चित्र - शिल्प प्रदर्शन, पर्यावरणपूरक सेवा प्रदर्शन असे विविध उपक्रम आयोजित केले आहेत. पुढील दोन दिवसांत (१४ व १५ डिसेंबर) नवीन चित्रपट, चर्चासत्र व प्रदर्शनाचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे.

चित्राव म्हणाले, 'किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाने कोल्हापूर परिसरात पर्यावरणविषयक जाणिवांचा प्रसार करण्याची भूमिका बजावली. महोत्सवात सादर होणाऱ्या विविध चित्रकृतींच्या माध्यमातून जगभरातले प्रयोग स्थानिकांपर्यंत पोहोचले. त्यामधून प्रेरणा घेऊन अनेक तरुण पर्यावरण चळवळीत कार्यरत झाले. आता या महोत्सवाशी शिवाजी विद्यापीठ जोडले गेल्यामुळे भविष्यात विद्यापीठाच्या सहकार्याने ते जास्तीत जास्त युवा पिढीपर्यंत पोहोचवण्यात यश येईल.'

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी विद्यापीठाच्या शाश्वत धोरणासंदर्भात मांडणी केली. विद्यापीठ राबवित असलेल्या जल संधारण, ऊर्जा बचत आणि हरित परिसर या उपक्रमांसह भविष्यातीलही पर्यावरणपूरक योजना योजना सांगितल्या. किर्लोस्कर आणि शिवाजी विद्यापीठ या दोन समविचारी संस्था एकत्र आल्यामुळे आता पर्यावरणपूरक बाबी समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवता येतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी श्री. रानडे यांनी किर्लोस्कर उद्योग समूहाच्या हरित उपक्रमांची, तर धीरज जाधव यांनी समूहाच्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांची माहिती दिली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात तेराव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. शेजारी वीरेंद्र चित्राव, धीरज जाधव, सी.जी. रानडे, शरद आजगेकर, डॉ. रसिया पडळकर, डॉ. आसावरी जाधव आदी.

14 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३५० जणांचा महोत्सवात सहभाग

# विद्यापीठात दिसला विद्यार्थ्यांचा सृजनशील 'आविष्कार'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी भरविलेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये विद्यार्थी व संशोधकांमधील सृजनशीलतेबरोबरच सामाजिक जाणिवांची प्रचिती आली. सद्यस्थितीत मानवी समुदायाला भेडसावणाऱ्या व्यक्तिगत समस्यांपासून ते सामाजिक समस्यांपर्यंत आपापल्या परीने संशोधकीय मार्गाने उत्तर देण्याचा प्रयत्न या महोत्सवात दिसून आला.

या स्पर्धेत ३५० पदवी, पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन संशोधनपर प्रकल्प, पोस्टर सादर केले. विद्यार्थी विकास विभाग व भूगोल अधिविभाग यांनी या स्पर्धेचे संयोजन केले. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात पार पडलेल्या या महोत्सवाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उदघाटन झाले. यावेळी प्र-कुलगुरू, डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे नागरिक, शेतकरी यांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठीचे प्रकल्प होते. पर्यावरणीय समस्यांवर जैविक विघटनशील प्लास्टिकसारखे पर्याय सादर करणारे प्रकल्पही होते. शिवाय, तृतीयपंथीयांपासून वंचित घटकांच्या सामाजिक समावेशनासाठी, लोकांच्या मानसिक तणावावरील उपाययोजनांपर्यंतच्या प्रकल्पांचाही समावेश होता.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांनी फिरून सर्व प्रकल्पांची पाहणी केली. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. मीना पोतदार, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात आयोजित विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेतील प्रकल्पांची कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी पाहणी केली. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. मीना पोतदार, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 DEC 2023
लोकमत

# निवडुंगापासून बटवा, प्रदूषणाला हटवा

## 'आविष्कार'मध्ये विद्यार्थ्यांचे संशोधन : पेटंट मिळविण्यासाठी प्रयत्न करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जंगलात, रानावनात दिसणारे निवडुंग ही सर्वांच्याच ओळखीची वनस्पती. त्यामुळे तसे तिचे अप्रूप अनेकांना नाही मात्र, याच निवडुंगापासून पर्यावरणाचे रक्षण करत सांगलीच्या वेलिंग्टन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घड्याळाचा बेल्ट, औषधी गोळ्यांवरील आवरण, बटवा बनवून केमिकल वापराला कायमचा फाटा दिला आहे.

निवडुंगापासून बायोप्लास्टिक ही संकल्पना त्यांनी विकसित केली आहे. शिवाजी विद्यापीठात आयोजित आविष्कार संशोधन महोत्सवात सादर केलेल्या अनोख्या संशोधनाने निवडुंगाचे महत्त्व अधोरेखित केले.

वेलिंग्टन महाविद्यालयातील बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजीच्या तिसऱ्या वर्षात शिकणारे सुरजित आडगले व आस्था कुंदले या विद्यार्थ्यांनी निवडुंगावरचे हे संशोधन केले. गेल्या अडीच वर्षांपासून या विद्यार्थ्यांनी या संशोधनासाठी प्रयत्न चालविले होते. त्यासाठी त्यांनी निवडुंगाचे विविध गुणधर्म, त्याचे परिणाम याचा अभ्यास करून विविध प्रोडक्ट बनविले आहेत.



> निवडुंगावर केलेल्या या संशोधनासाठी पेटंट मिळावे ही अपेक्षा आहे. त्यासाठी लवकरच अर्ज करणार आहे. - सुरजित आडगले, विद्यार्थी

विद्यापीठात आयोजित आविष्कार संशोधन महोत्सवात वेलिंग्टन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी निवडुंगापासून बायोप्लास्टिक ही संकल्पना विकसित केली आहे. त्यांच्या या प्रकल्पाला डॉ. डी. टी. शिर्के यांनी भेट दिली.

14 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल जर्नालिझमचे अभ्यासक्रम सुरू करा

## डॉ. प्रतापसिंह जाधव; पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचा आढावा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात डिजिटल जर्नालिझमचे अभ्यासक्रम सुरू करा, अशा सूचना दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी बुधवारी प्रशासनाला केल्या.

'डॉ. ग. गो. जाधव अध्यासन' कामकाजाचा डॉ. जाधव यांनी आढावा घेतला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. अध्यासनाची इमारत शिवाजी विद्यापीठ परिसरातील आकर्षण ठरणारी आहे,. असे सांगत या अध्यासनातील अन्य कामांचा तातडीने प्रस्ताव सादर करा, अशी सूचना डॉ. शिर्के यांनी केली.



कोल्हापूरः दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी बुधवारी शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाची आढावा बैठक घेतली. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)

डॉ. जाधव म्हणाले, सध्याचे युग डिजिटल आहे. त्यादृष्टीने जर्नालिझमचे अभ्यासक्रम तयार करून ते सुरू करावेत. अध्यासनाच्या वतीने विद्यापीठात 'कम्युनिटी रेडिओ' सुरू केला जाणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर 'रेडिओ जॉकी'चाही अभ्यासक्रम सुरू करावा. अँकर निर्मिती अभ्यासक्रमही सुरू करता येईल. त्यादृष्टीने नियोजन करा, असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी अध्यासनाच्या वतीने सुरू असलेले अभ्यासक्रम, भविष्यातील योजना आदींची माहिती दिली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अभियंता गिरीश कुलकर्णी आदींनी चर्चेत सहभाग घेतला.

आर्किटेक्चर शीतल पाटील, अतुल शिरोडकर यांनी सादरीकरण केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शाखा अभियंता अनिता पाटील, ठेकेदार सुनील नागराळे, उपकुलसचिव रणजित यादव, धैर्यशील पाटील, सदानंद पाटील, नितीन ऐनापुरे, रमेश पोवार, एन. डी. लाड आदींसह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

14 DEC 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आविष्कार'द्वारे सृजनशीलतेला वाव

## शिवाजी विद्यापीठस्तरीय महोत्सवात ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात बुधवारी भरवलेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये विद्यार्थी व संशोधकांमधील सृजनशीलतेबरोबरच सामाजिक जाणिवांची प्रचिती आली. सद्यःस्थितीत मानवी समुदायाला भेडसावणाऱ्या व्यक्तिगत समस्यांपासून ते सामाजिक समस्यांपर्यंत आपापल्या परीने संशोधकीय मार्गाने उत्तर देण्याचा प्रयत्न या महोत्सवात दिसून आला. या स्पर्धेत सुमारे ३५० पदवी, पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन संशोधनपर प्रकल्प, पोस्टर सादर केले. विद्यार्थी विकास विभाग व भूगोल अधिविभाग यांनी या स्पर्धेचे संयोजन केले.



विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे उद्दिष्ट बाळगून विद्यापीठ दरवर्षी आविष्कार संशोधन महोत्सव आयोजित करते. जिल्हास्तरीय महाविद्यालयीन स्पर्धेच्या फेऱ्यानंतर बुधवारी विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झाला. सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू, डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले.

यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, भूगोल अधिविभागाच्या डॉ. मीना पोतदार, डॉ. जगदीश सपकाळे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सोमनाथ पवार आदी उपस्थित होते. तविविध अधिविभागातील तसेच महाविद्यालयांतील शिक्षकांनी परीक्षक म्हणून तसेच समन्वयक म्हणूनही काम पाहिले.

पदवी, पदव्युत्तर स्तरीय विद्यार्थी व संशोधक विद्यार्थी अशा तीन स्तरांमध्ये मानव्यशास्त्र, भाषा आणि कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान तसेच वैद्यकीय आणि फार्मसी या सहा श्रेणींमध्ये प्रकल्प सादरीकरण करण्यात आले. यामध्ये नागरिक, शेतकरी यांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठीचे प्रकल्प होते. पर्यावरणीय समस्यांवर जैविक विघटनशील प्लास्टिकसारखे पर्याय सादर करणारे प्रकल्पही होते. तृतीयपंथीयांपासून वंचित घटकांच्या सामाजिक समावेशनासाठी, लोकांच्या मानसिक तणावावरील उपाययोजनांपर्यंतच्या प्रकल्पांचाही समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 DEC 2023
सकाळ

# मातीविना शेती अन् पर्यावरणपूरक कचराकुंडी

## शिवाजी विद्यापीठात संशोधनाचा 'आविष्कार'; महोत्सवात यंदा विद्यार्थ्यांची संख्या वाढली

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : मातीविना शेती, पर्यावरणपूरक कचराकुंडी (स्मार्ट नेचर फ्रेंडली डस्टबिन), सलाईन पातळी नियंत्रण करणारी वायरलेस यंत्रणा, आदी संशोधनातील नवसंकल्पनांचे आज शिवाजी विद्यापीठात दर्शन घडले. विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात यंदा सुमारे ३५० विद्यार्थी सहभागी झाले. त्यांची संख्या गेल्या वर्षापेक्षा वाढली.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात भूगोल अधिविभागाने आयोजित केलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. मेघा गुळवणी, एस. एस. महाजन, डी. एच. दगडे, पी. टी. गायकवाड, मीना पोतदार आदी उपस्थित होते. या प्रमुख उपस्थितांनी महोत्सवातील प्रकल्प, भित्तीपत्रकांची पाहणी करून स्पर्धकांसमवेत संवाद साधला. या महोत्सवात शेती व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र व औषध निर्माणशास्त्र, मानव्यशास्त्र, वाणिज्य या गटात पदवी, पदव्युत्तर पदवी आणि संशोधक विद्यार्थी सहभागी झाले. त्यातील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीच्या सुदीप कुलकर्णी, तैफूर पटवेगार यांनी हॉस्पिटलमधील रूग्णांना लावण्यात येणाऱ्या सलाईनची पातळी नियंत्रण करणारी वायरलेस यंत्रणेचे सादरीकरण केले. न्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सेन्सरवर आधारित असलेली पर्यावरणपूरक स्वयंचलित कचराकुंडीचे संशोधन मांडले. साताऱ्यातील एलबीएस कॉलेजच्या अपर्णा मोरे, श्रावणी भानसे यांनी मातीविना शेतीचे, तर डॉ. घाळी कॉलेजच्या ऋषी दळवी याने केळीच्या मोण्यांपासून नर्सरीतील रोपे तयार करण्यासाठी लागणाऱ्या पर्यावरणपूरक कुंडीचे सादरीकरण केले. आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज पलूसच्या अथर्व मोरे याने प्लॅस्टिकपासून थर्मल वीजनिर्मितीचा प्रकल्प सादर केला. अधिकतर स्पर्धक विद्यार्थ्यांनी संशोधनापर भित्तीपत्रकांचे सादरीकरण केले. त्यात तणाव व्यवस्थापन, महिला सक्षमीकरण, ऑनलाईन परीक्षेचा विद्यार्थ्यांवरील परिणाम, आदी विषयांचा समावेश होता.

दरम्यान, यावर्षी आविष्कार संशोधन महोत्सव पहिल्या टप्प्यात महाविद्यालयीन पातळीवर घेण्यात आला. त्याचा चांगला परिणाम म्हणजे विद्यापीठस्तरीय महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धेक विद्यार्थ्यांची संख्या सुमारे शंभरने वाढली आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी आविष्कार संशोधन महोत्सव पार पडला. त्यातील नवसंशोधन प्रकल्प पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली. (सकाळ छायाचित्रसेवा : बी. डी. चेचर)

> 'समाजोपयोगी आणि नव्या विषयांवरील संशोधन आणि कल्पनांची माहिती या महोत्सवात मिळाली. त्याने निश्चितपणे ज्ञानात भर पडली.
>
> **- लक्ष्मी कोळी**, कोल्हापूर

> 'या महोत्सवात मी पहिल्यांदाच सहभागी झालो. दातांच्या कवळी स्वच्छतेबाबतचे संशोधन मांडले. खूप चांगला अनुभव मिळाला. नव्या संशोधनाची माहिती मिळाली.
>
> **- ऋतुराज जाधव**, अंबप

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 DEC 2023
पुढारी

# खगोलप्रेमींना आज उल्कावर्षाव पाहण्याची संधी

कोल्हापूर : खगोलप्रेमींना उल्कावर्षाव पाहण्याची संधी मिळणार आहे. दि. ४ ते २० डिसेंबर या कालवधीत मिथुन राशीतून उल्का वर्षाव सुरू आहे. गुरुवारी (१४ डिसेंबर) रात्री सर्वात मोठा व नेत्रदीपक असा उल्कावर्षाव पाहता येणार आहे. दरवर्षी हा उल्कावर्षाव डिसेंबर महिन्यात होतो. चंद्र अस्तानंतर साधारणतः ताशी १०० ते १५० एवढ्या उल्कांचा वर्षाव मिथून राशीतून दिसण्याची शक्यता आहे. मिथुन राशीतून होणार हा उल्कावर्षाव हा धूमकेतूमुळे नसून ३२०० फेथॉन या लघुग्रहामुळे होणारा उल्कावर्षाव आहे. हा लघुग्रह मंगळ आणि गुरू ग्रहांच्या कक्षांच्या दरम्यानच्या लघुग्रहांच्या पट्ट्यातील एक असा लघुग्रह आहे, अशी माहिती डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभामुळे सोमवारच्या परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६० वा पदवीदान समारंभ सोमवार, दि. १८ डिसेंबर रोजी आहे. या दिवशी पूर्वनियोजित असलेल्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. या दिवशी असलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

14 DEC 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उल्का वर्षाव पाहण्याची आज खगोलप्रेमींना सुवर्णसंधी

पन्हाळा, ता. १३ : अवकाशात रात्रभर तेजस्वी दिसणाऱ्या उल्का म्हणजेच उल्का वर्षाव. दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये मिथुन राशीतून उल्का वर्षाव पाहता येतो. यावर्षी ४ डिसेंबरपासून २० डिसेंबरपर्यंत मिथुन राशीतून उल्का वर्षाव होत आहे. तर १४ डिसेंबरच्या रात्री सर्वात मोठा व नेत्रदीपक असा उल्का वर्षाव पाहण्याची सुवर्णसंधी आहे. चंद्रास्त लवकरच होणार असल्याने खगोलप्रेमींना अवकाश निरीक्षणाची ही एक सुवर्णसंधी आहे, अशी माहिती अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

ते म्हणाले, 'मिथुन राशीतून होणार हा उल्कावर्षाव हा धूमकेतूमुळे नसून ३२०० फेथॉन या लघुग्रहामुळे होणारा उल्का वर्षाव आहे. मिथुन राशीतून यावर्षी होणारा उल्का वर्षाव बघण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपकरणांची आवश्यकता नाही. साधारणत एका मिनिटाला १ ते २ उल्का पडताना दिसतील. सूर्य मावळल्यापासून ते पहाटे साडेचारपर्यंत मिथुन राशीतून होणार उल्कावर्षाव पाहता येईल.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 DEC 2023
सकाळ

# 'एलएलएम'च्या विद्यार्थ्यांना दिलासा

## परीक्षा देण्याचा मार्ग मोकळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : वर्गात २० टक्क्यांहून अधिक उपस्थिती असलेल्या 'एलएलएम' अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा परीक्षा देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुढील सत्रात उपस्थितीचा निकष पूर्ण करण्याच्या अटीवर त्यांना परीक्षा देण्यास परवानगी देण्याचा ठराव आज शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्य करण्यात आला.

एलएलएम अभ्यासक्रमाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात ७५ टक्के हजेरी भरली नसल्याच्या कारणावरून परीक्षा देण्यास अपात्र ठरविण्यात आले. त्यावर या विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करता त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून या अपात्रतेबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची विनंती अधिसभा सदस्य ॲड. स्वागत परुळेकर यांनी विद्यापीठाला केली होती. त्यावर आजच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. ज्या विद्यार्थ्यांची २० टक्क्यांहून अधिक उपस्थिती आहे. त्यांना पुढील सत्रात उपस्थितीचा निकष पूर्ण करण्याच्या अटीवर त्यांना परीक्षा देण्यास परवानगी देण्याचा ठराव मान्य करण्यात आला. विद्यापीठाच्या कल्याण निधी योजनेचे जे प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. मतदार जनजागृती अभियान राबविण्यासाठी विद्यापीठ आणि कोल्हापूर महानगरपालिका यांच्यातील सामंजस्य कराराला मान्यता मिळाली. दीक्षान्त समारंभ वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रमुख उपस्थितांच्या हस्ते पारितोषिके देण्याची संख्या मर्यादित करण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेष कक्ष स्थायी समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

14 DEC 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'वसुंधरा' कडून पर्यावरणपूरक उपक्रमांना गती

## वीरेंद्र चित्राव यांचे प्रतिपादन : विद्यापीठात १३व्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने कोल्हापूरसह राज्यभरात पर्यावरणपूरक उपक्रमांना गती दिली आहे, असे प्रतिपादन महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि किर्लोस्कर उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १३ वा वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झाले. या समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

चित्राव म्हणाले, महोत्सवांशी शिवाजी विद्यापीठ जोडल्यामुळे भविष्यात विद्यापीठाच्या सहकार्याने ते जास्तीत जास्त युवा पिढीपर्यंत पोहोचवण्यात यश येईल. तसेच त्यांनी महोत्सवाच्या 'सकस अन्न, समृद्ध निसर्ग, आणि आरोग्यपूर्ण समाज' या संकल्पनेची माहिती दिली.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित १३ व्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत वीरेंद्र चित्राव, धीरज जाधव, सी. जी. रानडे, शरद आजगेकर, डॉ. रसिया पडळकर, डॉ. आसावरी जाधव.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, किर्लोस्कर आणि शिवाजी विद्यापीठ या दोन समविचारी संस्था एकत्र आल्यामुळे आता पर्यावरणपूरक बाबी समाजातील तळागाळापर्यंत पोहचवता येतील. रानडे यांनी किर्लोस्कर उद्योग समूहाच्या हरित उपक्रमांची, तर मनुष्यबळ विकास विभागप्रमुख धीरज जाधव यांनी समूहाच्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांची माहिती दिली. डॉ. आसावरी जाधव यांनी पर्यावरणशास्त्र विभागाच्या उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी किर्लोस्कर उद्योग समूहाचे व्हाईस प्रेसिडेंट सी. जी. रानडे, समन्वयक शरद आजगेकर, डॉ. रसिया पडळकर आदी उपस्थित होते.

### शुक्रवारपर्यंत विद्यापीठात पर्यावरणावर चित्रपट व चर्चासत्रांचे आयोजन

महोत्सवात फोटोग्राफी स्पर्धा, चित्र – शिल्प प्रदर्शन, पर्यावरणपूरक सेवा प्रदर्शन असे विविध उपक्रम आयोजित केले आहेत. १५ डिसेंबरपर्यंत नवीन चित्रपट, चर्चासत्र व प्रदर्शनाचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे.

# वसुंधरा महोत्सवात जैवविविधतेचे दर्शन







कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि किर्लोस्कर उद्योग समूहाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील आयोजित वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जैवविविधतेचे दर्शन झाले. दुर्मिळ वनस्पती व प्राण्यांची छायाचित्रे, शिल्प आणि रेखाटन पाहण्यासाठी चित्रपटप्रेमींसह कलाकारांनी गर्दी केली होती. काहींना या जैवविविधतेचे छायाचित्र आपल्या कॅमेऱ्यात टिपण्याचा मोह आवरला नाही. बुधवारी विद्यापीठात भरलेल्या मेळ्यातून कलाकारांसह प्रेक्षक आणि विद्यार्थीनी वसुंधरा संवर्धनाचा संदेश ग्रहण केला. (छाया: रियाज ट्रेनर)







